# चला रोखूया प्लास्टिकच्या भस्मासुराला...

एक नया सवेरा लायेंगे
हम मिलकर पुरे भारत को
प्लास्टिक मुक्त बनायेंगे..



नवोपक्रम सादरकर्ते -

श्रीम. पल्लवी रमेश शिरोडे.
जि प शाळा कोंढवे धावडे
तालुका- हवेली जिल्हा -पुणे.

## स्पर्धकाची माहिती

**नवोपक्रमाचे शीर्षक** - **चला रोखूया प्लास्टिकच्या भस्मासुराला..**

**स्पर्धकाचे नाव** - **श्रीमती पल्लवी रमेश शिरोडे.**

**पद** - **प्राथमिक शिक्षिका**

**शैक्षणिक अर्हता** - M.Sc(Computer Science)

**व्यावसायिक अर्हता** - M.Ed

**जन्मतारीख** -15/08/1983

Email id - prs15883@gmail.com.

**फोन नंबर** - 9766315883

**शाळेचे नाव** - **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोंडवे धावडे .**
**तालुका- हवेली जिल्हा- पुणे**

**यु -डायस क्रमांक** - 27250510703

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे द्वारा आयोजित

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

2023-24

गट क्रमांक दोन

प्राथमिक शिक्षक गट

नवोपक्रम -चला रोखूया प्लास्टिकच्या भस्मासुराला..

सादरकर्ते- श्रीमती पल्लवी रमेश शिरोडे. M.Sc M.Ed

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोंढवे धावडे

तालुका -हवेली जिल्हा -पुणे

# अनुक्रमणिका


1. नवोपक्रमाची गरज व महत्त्व - ........ 6
2. उपक्रमाचे वेगळेपण ........ 7
3. उपक्रमाची उद्दिष्टे- ........ 7
4. नवोपक्रमाचे नियोजन- ........ 8
5. करावयाच्या कृतींचा क्रम- ........ 8
6. कार्यवाहीचे टप्पे/ वेळापत्रक- ........ 9
7. नवोपक्रमाची कार्यपद्धती- ........ 12

7.1 पूर्वस्थितीची निरीक्षणे/ नोंदी- ........ 12

7.2 कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन- ........ 12

7.2.1 प्रबोधन /जागृती- ........ 12

7.2.3 व्हिडिओद्वारे जाणीव जागृती- ........ 13

7.2.4 प्रश्नोत्तरे/ चर्चा तज्ञांशी संवाद ........ 13

7.2.5. प्लास्टिक व ई कचरा संकलन मोहिमेबद्दल गावात जनजागृती- ........ 13

7.2.6 चित्रकला स्पर्धेचे आयोजन- ........ 14

7.2.7. 4R तंत्राचा अवलंब- ........ 15

7.2.8. कागदी पिशवी निर्मिती कार्यशाळा- ........ 15

7.2.9. राष्ट्रीय छात्र पर्यावरण प्रतियोगिता 2023 सहभाग- ........ 16

7.2.10 इको ब्रिक्स तयार करणे- ........ 16

7.2.11. माझा प्लॅस्टिकचा खाऊ- ........ 17

7.2.12 पर्यावरण पूरक गणेशोत्सव- ........ 18

7.2.13.निर्माल्यापासून खत निर्मिती कार्यशाळा- ........ 18

7.2.17 आकाशकंदील निर्मिती कार्यशाळा- ........ 19

7.2.15. Say NO to Plastic- ........ 19
7.2.16 दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्लास्टिक ,-वेस्ट कचरा संकलन मोहीम- ........ 19
8. उपक्रमासाठी इतरांची मदत ........ 20
9. उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षण व नोंदी- ........ 20
10.आलेख ........ 21
11. पुरावे- ........ 22
11.1 पुढारी पेपर मध्ये आलेली बातमी:- ........ 22
11.2 PEHEL 2023 संस्थेमार्फत मिळालेले प्रशस्तीपत्रक:- ........ 23
11.3 मुख्याध्यापक अभिप्राय व्हिडिओ लिंक. ........ 23
12. नवोपक्रमाची यशस्विता ........ 23
13. समारोप- ........ 24
**14. संदर्भसूची व परिशिष्टे-** ........ 24
उपक्रमात घेण्यात आलेल्या चाचणी लिंक- ........ 25
उत्तर चाचणीत सहभागी विद्यार्थी यादी- ........ 25

## 1. नवोपक्रमाची गरज व महत्त्व -

आज पर्यावरणासंबंधी समस्यांनी सर्व जग त्रस्त झालेले आहे. जलप्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच जमीन प्रदूषण या सर्व समस्यांबद्दल सगळे देशात एकत्र येऊन विचार विनिमय करत आहेत .जागतिक तापमान वाढ ओझोन थराचा नाश, अवकाळी पाऊस ,ऋतूतील अनियमित्ता, प्लास्टिक आणि ई-वेस्ट कचरा, नदी ,समुद्र प्रदूषण या सर्व पर्यावरण विषयक समस्यांना आपण सामोरे जात आहोत. रस्त्यावर कचऱ्याची ढिगच्या ढीग पडलेले दिसतात .

कचऱ्याची विल्हेवाट ही एक मोठी समस्या आपल्यापुढे आहे .घरात रोज तयार होणाऱ्या कचऱ्याचे ओला कचरा व सुका कचरा असे विलगीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली.  परंतु आपल्या घरात शाळेत गावात रोज निर्माण होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचे काय? प्लास्टिक पर्यावरणाला घातक आहे .त्याचे विघटन वर्षानुवर्ष होत नाही .त्यामुळे  सागरी जिवांना धोका निर्माण झाला आहे, जमीन प्रदूषण होत आहे अशावेळी प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी प्लास्टिक कचऱ्याची विलगीकरण, सिंगल युज प्लास्टिक न वापरणे, प्लास्टिकला विकल्प म्हणून इतर साधने वापरणे या सर्व गोष्टी विषयक जनजागृती जनसंहभाग घेणे मला महत्वाचे वाटू लागले.

जनजागरण हा कोणत्याही परिवर्तनाचा आधार असतो हे लक्षात घेऊन प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी प्लास्टिक कचरा व ई- कचरा यांचे पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करून पर्यावरण संवर्धन व संरक्षण यासाठी चला रोखूया प्लास्टिकच्या भस्मासुराला ...हा उपक्रम गाव पातळीवर ,शाळा पातळीवर जनजागृती करून हाती घेतला.पर्यावरण स्वच्छ ठेवण्याकरता कचऱ्याची योग्य विल्हेवाट आवश्यक आहे .गेल्या काही दशकांमध्ये पॉलिथिनने भयानक समस्या निर्माण केली आहे .मायक्रो प्लास्टिकच्या रूपाने असाध्य रोगांचे कारण बनलेल्या प्लास्टिकला पर्याय देण्याकरता प्रयत्न करण्याचे ठरवले.

सिंगल युज उपयोगात येणाऱ्या पॉलिथिनच्या बहिष्कारा करिता समाजात वातावरण तयार करण्याच्या हेतूने शाळेतील विद्यार्थ्यांच्या विचारात बदल, सवयीत बदल

करण्याच्या दृष्टीने कार्य योजना ठरवली. नव्या पिढीमध्ये प्लास्टिक कचऱ्याबाबत जागरूकता आणून त्यांना **पर्यावरण मित्र** बनवण्याचे ठरविले.

## 2. उपक्रमाचे वेगळेपण

कचरा व्यवस्थापनात ओला कचरा व सुका कचरा वेगळा करणे, कंपोस्ट खत तयार करणे यावर भर दिला जातो. परंतु कचऱ्यातील जमा होणारे प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक कचरा ,त्याचे पर्यावरणावरील दुष्परिणाम हा विषय दुर्लक्षिला जातो .म्हणूनच प्लास्टिकमुक्त भारत बनवण्याच्या दृष्टीने प्लास्टिक व ई कचऱ्याचे संकलन करून त्याचे विलगीकरण करणे, प्लास्टिक वापरास नकार देणे Refuse,प्लास्टिकला विकल्प म्हणून इतर साधने वापरणे, Reduce,पुनर्वापर करणे Reuse व त्यापासून इतर उत्पादन करणे Recycle या 4R संकल्पना शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये रुजवून विद्यार्थ्यांना, गावकऱ्यांना पर्यावरण स्नेही करण्यासाठी उपक्रम हाती घेतला .

## 3. उपक्रमाची उद्दिष्टे-

1. विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिकचे पर्यावरणावरील दुष्परिणाम सजीवांवर होणारे घातक परिणाम याबाबत जागरूकता निर्माण करणे.
2. विद्यार्थी पालक व नागरिक यांच्याकडून शाळा, घर व गाव पातळीवर तयार होणारा प्लास्टिक व ई कचऱ्याचे संकलन करणे व पुनर्वापराकरता देणे.
3. विद्यार्थी पर्यावरणस्नेही होण्याच्या दृष्टीने योग्य सवयी रुजवणे.
4. प्लास्टिक वापरास नकार देणे, कमीत कमी प्लास्टिकचा वापर करणे ,प्लास्टिकला विकल्प शोधणे, प्लास्टिक कचऱ्याचे संकलन व पुनर्वापर या 4R बाबत विद्यार्थ्यांना जागरूक करून कार्य योजनेत सामील करून घेणे.
5. विद्यार्थी ,शिक्षक व पालक यांची निसर्गाशी जवळीक साधून पर्यावरण पूरक कार्यपद्धतीचा अवलंब करणे.

## 4. नवोपक्रमाचे नियोजन-

घरात किंवा शाळेत कचरा डस्टबिन मधील कचऱ्याचे निरीक्षण केल्यास त्यात प्लास्टिकचा जमा होणारा दैनंदिन कचरा मोठ्या प्रमाणात आढळतो .शाळेत जवळपास 300 विद्यार्थी असल्याने त्यांचा रोजचा खाऊ खाल्ल्यानंतरचा प्लास्टिक पिशव्यांचा कचरा हवाबंद प्लॅस्टिकची पाकिटे, चॉकलेटची वेष्टने शाळेत सर्वत्र पडलेली दिसायचे.. प्लास्टिकच्या युज अँड थ्रो बाटल्यांचा खच ,भाजीसाठी वापरावयाच्या प्लास्टिक पिशव्या ,थर्माकोल अत्यंत मोठ्या प्रमाणात जमा होताना दिसते.

भारतात दररोज 100 टन प्लास्टिक कचरा निर्माण होतो .अशावेळी पर्यावरण गतिविधि संस्थेच्या लोकांशी चर्चा करून मी माझ्या शाळेत माझ्या कार्यक्षेत्रातील गावात प्लास्टिकच्या कचऱ्याच्या दुष्परिणामाबद्दल जनजागृती करण्याचे ठरवले.

## 5. करावयाच्या कृतींचा क्रम-

1. प्लास्टिकच्या घातक दुष्परिणाम बद्दल सातत्याने परिपाठात माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे .
2. तसेच पालक सभा आयोजित करून पालकांना देखील या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रबोधन करणे . गावचे सरपंच व इतर पुढारी यांच्याद्वारे गावातील नागरिकांना नवोपक्रमात सहभागी करून घेण्यासाठी चर्चा करणे.
3. पर्यावरण दक्षता कृती मंचच्या सदस्यांशी विद्यार्थ्यांचा संवाद प्रश्नोत्तरे व चर्चा याद्वारे घडवून आणणे.
4. शाळेत व गावात प्लास्टिक व ई कचरा संकलन अभियानाचे पोस्टर जागोजागी लावून जनजागृती करणे.
5. पर्यावरण संवर्धन विषयावर शाळेत चित्रकला/ पोस्टर निर्मिती स्पर्धा आयोजित करणे.

World Paper Bag Day च्या निमित्ताने कागदी पिशवी निर्मिती कार्यशाळा आयोजित करणे.

6. केंद्रीय शिक्षा मंत्रालय आयोजित राष्ट्रीय छात्र **पर्यावरण प्रतियोगिता 2023** यामध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे.
7. इको ब्रिक्स(Eco -bricks) तयार करणे.
8. वापरून फेकून द्यावयाचे प्लास्टिक पेन, रिफील शार्पनर जमा करण्यासाठी '**माझा प्लॅस्टिकचा खाऊ** 'या बॉक्सची निर्मिती करणे.
9. पर्यावरणपूरक थर्माकोल ,प्लास्टिक मुक्त गणेशोत्सव 2023 उपक्रम राबविणे.
10. निर्माल्यापासून खत निर्मिती कार्यशाळा आयोजित करणे.
11. Say **NO** to plastic संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे.
12. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी **प्लास्टिक/ ई-वेस्ट कचरा संकलन** मोहीम राबवणे.

## 6. कार्यवाहीचे टप्पे/ वेळापत्रक-

| **अनुक्रम नंबर** | **सातत्याने / महिना** | **उपक्रमाचे नाव** | **विद्यार्थी कृती** | **उपक्रमाची लिंक द्वारे क्षणचित्रे** |
|---|---|---|---|---|
| 1 | सातत्याने चालणारा उपक्रम | प्लास्टिक व ई कचरा संकलन. | विद्यार्थी खाऊची प्लास्टिकची पाकिटे चॉकलेटची वेस्टने व इतर प्लास्टिक व्हरांड्यात लावलेल्या पोत्यामध्ये जमा करतात. | https://www.youtube.com/watch?v=nRfPyIlkhUs |
| | सातत्याने चालणारा उपक्रम | माझा प्लॅस्टिकचा खाऊ | वापरून फेकावयाचे प्लास्टिकचे पेन रिफील व शार्पनर मुले 'माझा प्लास्टिकचा खाऊ ' या बॉक्समध्ये नियमितपणे जमा करतात. | https://www.youtube.com/watch |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ?v=Cw6nsQPCyng |
| 2 | दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी | संकलित प्लास्टिक व ई कचरा पुनर्वापरासाठी देणे | दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी जमा केलेले महिनाभराचे प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक वेस्ट पुनर्वापरासाठी संकलन केंद्रात जमा केले जाते | https://drive.google.com/drive/folders/1okeB1nwb_Cb7ugyCPmSVpJghoJ3_e3OH?usp=drive_link |
| 3 | जून 2023 | पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन विषयावर चित्रकला व पोस्टर निर्मिती स्पर्धा. | पर्यावरण संवर्धन विषयावर विद्यार्थ्यांनी चित्र व पोस्टर काढून स्पर्धेत सहभाग नोंदवला | https://drive.google.com/drive/folders/1qQzL5-a5fsex3sD6zE0-Ipn90cVAu3Ux?usp=drive_link |
| 4 | जुलै 2023 | **World Paper bag day 12 July** निमित्त कागदी पिशवी निर्मिती कार्यशाळा. | विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत कागदी पिशव्या स्वतः तयार केल्या. व प्लास्टिक पिशवी ऐवजी कागदी पिशवीचा वापर करण्याचे ठरविले. | https://www.youtube.com/watch?v=zjl8GmFOurQ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पर्यावरण दक्षता कृती मंच मार्फत प्लास्टिकचे दुष्परिणाम यावर आधारित व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवून चर्चासत्र आयोजित करणे | प्लॅस्टिकचे घातक परिणाम यावर आधारित व्हिडिओ पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांनी पर्यावरणासंबंधी स्वतःला भेडसावणारे अनेक प्रश्नांसंबंधी तज्ञांशी प्रश्नोत्तरे यांच्या माध्यमातून चर्चा केली.. | https://drive.google.com/drive/folders/1rXrTGslsuW5hiIN7EiJtHn-b5hV4uBnG?usp=drive_link | |
| **5** | ऑगस्ट 2023 | केंद्रीय शिक्षा मंत्रालय आयोजित राष्ट्रीय छात्र पर्यावरण स्पर्धा **Quiz** यामध्ये विद्यार्थी सहभाग. | विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पर्यावरण क्वीजमध्ये सहभाग घेऊन प्रशस्तीपत्रक प्राप्त केले | https://drive.google.com/drive/folders/1nzN6k7YZWjg3gPjCLtZUj34AcygpbJf_?usp=drive_link | |
| | | इको ब्रिक्स निर्मिती | विद्यार्थ्यांनी घरी दररोज जमा होणारा प्लास्टिक कचरा एका प्लास्टिकच्या बाटलीमध्ये जमा करून इको ब्रिक्स तयार केले. | https://drive.google.com/drive/folders/1HJi7z8hhMI5I1bnNJcSxrGEqy809hiW6?usp=drive_link | |
| **6** | सप्टेंबर 2023 | पर्यावरण पूरक प्लास्टिक ,थर्माकोल मुक्त गणेशोत्सव. | प्लास्टिक व थर्माकोल मुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प विद्यार्थी व शिक्षकांनी घेतला. | https://www.youtube.com/watch?v=4esRmtz8gGo | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निर्माल्यापासून खत | गणेशोत्सवात तयार होणाऱ्या निर्माल्यापासून खत कसे तयार करावे हे प्रत्यक्ष कार्यशाळेत शिकवण्यात आले. विद्यार्थ्यांशी प्रश्न उत्तराच्या | https://www.youtube.com/watch?v=4esRmtz8gGo | |

## 7. नवोपक्रमाची कार्यपद्धती-

### 7.1 पूर्वस्थितीची निरीक्षणे/ नोंदी-

उपक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यार्थी, पालक प्लॅस्टिक आणि इलेक्ट्रॉनिक कचरा व त्याचे पर्यावरणावरील ,सजीवांवरील घातक परिणाम याबाबत  अनभिज्ञ होते. शाळेत सर्वत्र प्लास्टिकच्या रॅपर्स ,चॉकलेट, खाऊची वेष्टने इतरत्र कोठेही पडलेली दिसायची..जमीन प्रदूषण ,जल प्रदूषण यामध्ये प्लास्टिक कचऱ्यामुळे कशी भर पडते  याबाबत विद्यार्थ्यांना माहिती नव्हते.

### 7.2 कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन-

#### 7.2.1 प्रबोधन /जागृती-

विद्यार्थ्यांना सातत्याने परिपाठात दररोज निर्माण होणारा प्लास्टिकचा कचरा व त्याचे पर्यावरणावरील घातक परिणाम याबाबत माहिती सांगितली. तसेच  जागतिक पर्यावरण दिन 2023 ची थीम Solution to Plastic Pollution  यावर भर देऊन जागृती केली. तसेच पालक सभा घेऊन पालकांशी देखील या विषयावर चर्चा करून त्यांचे प्रबोधन केले.

### 7.2.3 **व्हिडिओद्वारे जाणीव जागृती-**

प्लास्टिक कचरा त्यामुळे होणारे जमिनीचे प्रदूषण, प्लास्टिक कचरा नदी ,समुद्रात जमा होऊन पाणी प्रदूषण कसे होते सागरी जीवन कसे धोक्यात येते याबद्दल मार्गदर्शनपर व्हिडिओ मुलांना वर्गनिहाय दाखवण्यात आला.




### 7.2.4 **प्रश्नोत्तरे/ चर्चा तज्ञांशी संवाद**

PEHEL प्लास्टिक पुनर्वापर Recycle करणाऱ्या संस्थेच्या तज्ञांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांशी प्रश्न उत्तराच्या माध्यमातून संवाद साधण्यात आला व त्यांना प्लास्टिकच्या दुष्परिणाम बद्दल जाणीव करून देण्यात आली.

### 7.2.5. **प्लास्टिक व ई कचरा संकलन मोहिमेबद्दल गावात जनजागृती-**

शाळेत व गावात प्लास्टिक व ई कचरा संकलन अभियानाचे पोस्टर जागोजागी लावून जनजागृती केली.

शाळेमध्ये पालक सभा आयोजित करून प्लास्टिकचा वाढता वापर व त्याची योग्य विल्हेवाट करण्याविषयी उदासीनता यामुळे पर्यावरणाला निर्माण झालेला गंभीर धोका या विषयावर प्रबोधन व जागृती करण्यात आली.ई कचरा किंवा इलेक्ट्रॉनिक कचऱ्यामध्ये बॅटरी, संगणकाचे

भाग ,तारा कोणत्याही प्रकारचे विद्युत उपकरण ,इलेक्ट्रॉनिक खेळणी ,रिमोट ,घड्याळे ,सेलफोन बल्ब ट्यूबलाइट्स यांचा समावेश होतो.




### 7.2.6 चित्रकला स्पर्धेचे आयोजन-

पर्यावरण संवर्धन विषयावर शाळेत स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन व संरक्षण विषयावर चित्रकलेच्या माध्यमातून मुक्त अभिव्यक्त होण्याची संधी दिली.



7.2.7. **4R तंत्राचा अवलंब-**

**Refuse**- सिंगल युज (एकल वापर )प्लास्टिक वापरू नये यासाठी जागृती निर्माण केली.
**Reduce**- प्लास्टिक पिशवीचा कमीत कमी वापर करून भाजी, किराणा आणण्यासाठी कापडी पिशवीचाच वापर करण्याचे विद्यार्थी व पालकांच्या मनावर बिंबवले.
**Reuse**- प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर रोपे लावण्यासाठी करणे, वर्गात शाळेत खाऊ खाल्ल्यानंतरचे प्लास्टिक रॅपर्स चॉकलेटचे वेष्टने आणि इतर प्लास्टिक बाटल्या, पिशव्या शाळेतील व्हरांड्यात वेगळे पोते लावून जमा करण्यासाठी सुरुवात केली .इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत सर्व विद्यार्थी प्लास्टिक डस्टबिन मध्ये न टाकता स्वतंत्रपणे पोत्यात जमा करू लागले. सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.
**Recycle-** दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी शाळेत जमा झालेले प्लास्टिक व ई कचरा, तसेच गावातील नागरिक पालक घरी देखील प्लास्टिक कचरा वेगळा जमा करून महिन्याच्या शेवटच्या रविवारी संकलन केंद्रामध्ये आणून देऊ लागले असा जमा झालेला सर्व प्लॅस्टिक व ई कचरा पुनर्वापरासाठी देण्याचे व्यवस्था करण्यात आली.

7.2.8. **कागदी पिशवी निर्मिती कार्यशाळा-**

***कापडी /कागदी पिशवी घरोघरी***
***पर्यावरणाचे रक्षण करी...***

**12** जुलै रोजी world Paper bag day त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी प्लास्टिक पिशवीच्या वापरा ऐवजी कागदी पिशवी वापरण्यास प्रोत्साहित केले .इयत्ता चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना कागदी पिशवी कशी बनवावी याचे प्रात्यक्षिक दाखवून कागदी पिशव्या विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतल्या.



7.2.9. **राष्ट्रीय छात्र पर्यावरण प्रतियोगिता 2023 सहभाग-**

पर्यावरण संवर्धन गतीविधीमध्ये विद्यार्थ्यांकडून शाळेमध्ये बिजारोपण करून घेण्यात आले तसेच राष्ट्रीय स्तरावरील पर्यावरणासंबंधी प्रश्नमंजुषा सोडवून घेण्यात आली. राष्ट्रीय पर्यावरण स्पर्धेत भाग घेतल्याने पर्यावरण संरक्षण, प्लास्टिक प्रदूषण याबाबत जागृती निर्माण झाली व विद्यार्थ्यांना केंद्रीय शिक्षा मंत्रालयाकडून ऑनलाइन प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले. शाळेतील जवळपास पहिली ते पाचवीच्या 40 व सहावी, सातवीच्या 35 विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्र पर्यावरण प्रतियोगिता 2023 चे प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले

7.2.10 **इको ब्रिक्स तयार करणे-**

जगात प्लास्टिकचा प्रश्न बिकट होत चालला आहे.. प्लास्टिक नष्ट व्हायला हजारो वर्ष लागतात. पॉलिथिन आणि अन्य प्लास्टिक कचरा पाणी , जमीन व वायू प्रदूषित करतो. रस्त्याने जाणारी जनावरे आणि सागरातील जलचर यांच्या जगण्यात हा कचरा विघ्न निर्माण करत आहे.

आता या पॉलिथिन प्लास्टिक यांचे नियमन करण्यासाठी इको ब्रिक्स हा पर्याय विद्यार्थ्यांपुढे ठेवण्यात आला. इको ब्रिक्स तयार करण्यासाठी प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये

पॉलिथिन , औषधांची वेष्टने आणि चॉकलेट चिप्सची वेष्टने  सर्व घट्ट बसेल अशी बाटली भरून इको ब्रिक्स तयार करून घेतले.

इको ब्रिक्स चा वापर झाडाचे पार बांधण्यासाठी, बाके बनवण्यासाठी घर बांधणीतसुद्धा करण्यात येतो.

### 7.2.11. **माझा प्लॅस्टिकचा खाऊ-**

शाळेमध्ये माझा प्लॅस्टिकचा खाऊ या नावाने एक बॉक्स बनवण्यात आला. यामध्ये वापरून झालेले फेकून द्यावयाचे पेन, रिफील, टोकयंत्र खराब झालेले प्लास्टिक पट्टी या बॉक्समध्ये जमा करण्याबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती करण्यात आली. कारण अशा छोट्या छोट्या प्लास्टिकच्या वस्तू सहजपणे कचऱ्यात जात होत्या. प्लास्टिक वस्तूंचे असे कलेक्शन रिसायकलिंग साठी नंतर देण्यात येते. विद्यार्थी ,शिक्षक यांनी अतिशय उत्साहाने या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.



7.2.**12 पर्यावरण पूरक गणेशोत्सव-**

थर्माकोल ,प्लास्टिक मुक्त इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्यासंबंधी शाळेत प्रबोधन करण्यात आले .शाडू मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचे विद्यार्थी व पालकांना आवाहन करण्यात आले व शाडू मातीच्या गणेशोत्सवानंतर **मातीदान उपक्रमात** शाडू मातीचे संकलन करण्यात आले.

7.2.13.**निर्माल्यापासून खत निर्मिती कार्यशाळा-**



पुढारी

संक्षिप्त

कोंढवे धावडे येथील जिल्हा परिषद शाळेत 'निर्माल्यापासून खतनिर्मिती' या कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थी.

**निर्माल्यापासून खतनिर्मितीबाबत मार्गदर्शन**

**वारजे :** कोंढवे धावडे येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पाचवी ते सातवीतील विद्यार्थ्यांसाठी 'निर्माल्यापासून खतनिर्मिती' कार्यशाळेचे आयोजन केले होते. या वेळी स्नेहल गोखले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गणेशोत्सवात आपल्या घरी जमा होणाऱ्या निर्माल्यापासून खत कसे तयार करावे, याचे प्रात्यक्षिक या वेळी विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. घरच्या घरी तयार झालेल्या खतामुळे सुंदर फूलझाडे कशी येऊ शकतात, याबाबत या वेळी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेत शंभरहून अधिक विद्यार्थी, पालक सहभागी झाले होते. शिक्षिका पल्लवी शिरोडे- शेंदुर्णीकर यांनी या कार्यशाळेचे नियोजन केले.

गणेशोत्सवा दरम्यान घराघरात तयार होणारे निर्माण्य नदीच्या प्रवाहात फेकून देण्यात ऐवजी निर्माल्यापासून घरच्या बगीचा साठी खत कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिक कार्यशाळेत दाखवण्यात आले व नंतर प्रश्न उत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला.

7.2.17 **आकाशकंदील निर्मिती कार्यशाळा-**



प्लास्टिकचे आकाशकंदील न वापरता कागदी आकाशकंदील वापरून पर्यावरणस्नेही दिवाळी साजरी करावी या हेतूने इयत्ता तिसरी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा घेण्यात आली.

7.2.15. **Say NO to Plastic-**

प्लास्टिक मुक्त भारत संकल्पना प्रत्यक्षात यावी यासाठी प्लास्टिकला विकल्प म्हणून इतर वस्तू आपण कशा पद्धतीने वापरू शकतो याबाबत प्रात्यक्षिक व उदाहरणे देण्यात आली. जसे की पेन स्टँड, प्लास्टिक कंपास पेटी पेन,प्लास्टिक बाटल्या ,सिंगल युज प्लास्टिक टाळून इतर वस्तूंचा वापर करणे.

7.2.16 **दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्लास्टिक ,-वेस्ट कचरा संकलन मोहीम-**

वापरलेल्या प्लास्टिकच्या वस्तूचे संकलन करणे व संकलित केलेल्या प्लास्टिक व प्रक्रिया करून नवीन वस्तू तयार करणे म्हणजेच पुनर्वापर ही बाब पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असल्याने घरोघरी ,गावातील नागरिकांनी विद्यार्थ्यांनी शाळेत वेगळा जमा केलेला प्लास्टिक व ई-वेस्ट कचरा संकलन मोहीम शाळेत दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी राबवण्यात येते व  जमा झालेला प्लॅस्टिक व इलेक्ट्रॉनिक कचरा पुर्नवापरासाठी पर्यावरण दक्षता कृती मंच  यांच्याकडे देण्यात येतो.



### 8. उपक्रमासाठी इतरांची मदत

‘चला रोखूया प्लास्टिकच्या भस्मासुराला’ या उपक्रमासाठी गावचे सरपंच माननीय श्री नितीन धावडे, गावातील पुढारी श्री संतोष शेलार यांनी पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने उपक्रमाचे महत्त्व जाणून गावात उपक्रमाचा प्रचार केला. शाळेच्या मुख्याध्यापिका मा. श्रीम. मनीषा देशमुख यांनी उपक्रमास प्रोत्साहन देऊन सर्व विद्यार्थी व शिक्षक यांना उपक्रमात सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. पर्यावरण दक्षता कृती मंचाच्या सदस्यांनी प्लास्टिक कलेक्शन /रीसायकलिंग साठी मदत केली.

### 9. उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षण व नोंदी-

विद्यार्थ्यांना उपक्रमाच्या माध्यमातून प्लास्टिकचे पर्यावरणावरील दुष्परिणाम मनात रुजवले व त्याचे फलित कृतीतून तसेच चाचणीतून आजमावले .विद्यार्थ्यांची 10 गुणांची बहुपर्यायी प्रश्न असलेली उत्तर चाचणी घेण्यात आली .

उपक्रमाची फलनिष्पत्ती वृत्तालेखाद्वारे प्रतिसाद दर्शवला आहे.

10.**आलेख**

https://forms.gle/XidyofyPJYpR4pBQ7




वरील आलेखाच्या विश्लेषणावरून असे दिसून येते की, विद्यार्थी प्लास्टिक कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाबाबत जागरूक झाले असून त्यांच्या सवयींमध्ये बदल झालेला आहे व आता पर्यावरणपूरक कृती सातत्याने केल्याने योग्य सवयीत त्याचे रूपांतर झालेले दिसून येते. नवोपक्रमाचे यशस्विता पर्यावरण पूरक सकारात्मक वर्तनातून शंभर टक्के दिसून येते. 'चला रोखूया प्लास्टिकचा भस्मासुराला' या नावाला सार्थ कृती विद्यार्थी ,शिक्षक व पालक करत आहेत त्यामुळे प्लास्टिकच्या या भस्मासुराला रोखण्यात नक्कीच यश मिळणार असा सार्थ विश्वास निर्माण झाला.

11. **पुरावे-**

उपक्रमाचे फोटो व youtube लिंक्स सोबत जोडले आहेत.

1.https://drive.google.com/drive/folders/1r4xd1CAac4x7ZoYLh2U26rs7Tu-5d7j4?usp=drive_link

2. https://youtu.be/5s3P9Hh0Ikw?si=8uIG88nFKI6bKITn

3. https://www.youtube.com/watch?v=nRfPyIIkhUs

4. https://www.youtube.com/watch?v=Cw6nsQPCyng

5. https://www.youtube.com/watch?v=zjl8GmFOurQ

6. https://www.youtube.com/watch?v=6RPBiM1Issg

7. https://www.youtube.com/watch?v=4esRmtz8gGo

8. https://www.youtube.com/watch?v=4esRmtz8gGo

11.1 **स्थानिक वृत्तपत्रांनी उपक्रमाची घेतलेली दखल:-**

पुढारी

## पर्यावरणासाठी विद्यार्थ्यांचा हातभार

### कोंढवे-धावडे येथे शाळेत ई-वेस्ट संकलन केंद्र सुरू

पुढारी ANCHOR

**वारजे : पुढारी वृत्तसेवा**

**पुणे महापालिका आणि पहल सामाजिक संस्थांच्या वतीने कोंढवे-धावडे येथील जिल्हा परिषद शाळेत ई-वेस्ट आणि प्लॉस्टिक कचरा संकलन केंद्र सुरू केले आहे. संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे शाळेतील मुलांचा पर्यावरण संवर्धनासाठी हातभार लागणार आहे.**




**कोंढवे-धावडे येथील जिल्हा परिषद शाळेत ई-वेस्ट आणि प्लॉस्टिक कचरा संकलन केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी मान्यवर, शिक्षक व विद्यार्थी.**

कोंढवे-धावडे शाळेतील शिक्षिका पल्लवी शिरोडे-शेंदुर्णीकर आणि राहुल शेंदुर्णीकर यांच्या पुढाकाराने हे केंद्र सुरू केले आहे. या केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी कोंढवे-धावडे गावचे माजी सरपंच नितीन धावडे, माजी उपसरपंच अविनाश सरोदे, नितीन वाघ, संतोष शेलार, विकास कांबळे आदी उपस्थित होते.

प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी या केंद्रावर ई-वेस्ट आणि प्लॉस्टिक कचरा जमा केला जाणार आहे. त्यानंतर या कचऱ्यातील दुरूस्त होऊ शकतील, अशा वस्तू गरजूंना दान केल्या जाणार असून, उरलेला कचरा अधिकृत प्रक्रिया प्रकल्पांवर पाठविला जाणार आहे. संकलित केलेल्या प्लॉस्टिक व ई-कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

प्लॉस्टिक पर्यावरणाला कसे घातक आहे व प्लॉस्टिकचे विघटन वर्षानुवर्षे होत नाही. यामुळे प्लॉस्टिक कचरा वेगळा करणे व त्याचा पुनर्वापर करणे किती आवश्यक आहे, या शिक्षकांना शाळेतील विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शाळेतील विद्यार्थी आपल्या घरी असलेला प्लॉस्टिक कचरा गोळा करून या केंद्रात जमा करत आहेत. तसेच गावातील नागरिकांनादेखील प्लॉस्टिक कचरा या केंद्रात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

My Pune Edition
Mar 6, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

लोकमत




**कोंढवे धावडे येथे इ-वेस्ट आणि प्लॉस्टिक कचरा संकलन केंद्र सुरु**

## कोंढवे धावडेत प्लास्टिक कचरा संकलन केंद्र सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिवणे :** पुणे महानगरपालिका आणि स्थानिक सामाजिक संस्थांद्वारे पहल संस्थेच्या वतीने कोंढवे धावडे येथील जिल्हा परिषद शाळेत ई-वेस्ट आणि प्लास्टिक कचरा संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

कोंढवे धावडे शाळेतील शिक्षिका पल्लवी शिरोडे-शेंदुर्णीकर आणि राहुल शेंदुर्णीकर यांनी हे केंद्र सुरु केले आहे. ई-वेस्ट आणि प्लास्टिक कचऱ्याचे यावेळी मोठ्या प्रमाणात संकलन करण्यात आले. संकलित केलेल्या ई-कचऱ्याचे व प्लास्टिकचे सुयोग्य व्यवस्थापन करणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. ई-कचरा आणि प्लास्टिक अधिकृत पुनर्वापर प्रक्रियेसाठी पोहोचविले जाईल.

यावेळी सरपंच नितीन धावडे, शिवसेना विधानसभा प्रमुख नितीन वाघ, जिल्हा समाजकल्याण दक्षता व नियंत्रण समिती सदस्य संतोष शेलार, उपसरपंच अविनाश सरोदे, विकास कांबळे उपस्थित होते.

11.2 PEHEL 2023 संस्थेमार्फत मिळालेले प्रशस्तीपत्रक:-




11.3 **मुख्याध्यापक अभिप्राय व्हिडिओ लिंक**.

https://youtu.be/-gAl3k_qTUo?si=Ltl3lfyCkekMYNQX

## 12. नवोपक्रमाची यशस्विता

i. विद्यार्थी, पालक प्लास्टिकच्या पर्यावरणावरील दुष्परिणाम, सजीवांवर होणारे घातक परिणाम या बाबत जागरूक होतात.

ii. विद्यार्थी पॉलिथिनचा कमीत कमी वापर करतात प्लास्टिकला विकल्प शोधून कागदी /कापडी पिशवी पर्यायांचा अवलंब करतात.

iii. विद्यार्थी व पालकांकडून शाळेत व घरी तयार होणाऱ्या प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे स्वतंत्रपणे संकलन करून संकलन केंद्रात जमा करतात.

iv. विद्यार्थी पर्यावरण स्नेही कृतींचा अवलंब करून योग्य सवयीद्वारे आचरणात बदल करून निसर्गाशी जवळीक साधतात.

नवोपक्रमाच्या आयोजनानंतर हा नवोपक्रम 100 टक्के यशस्वी झाला आहे .

विद्यार्थ्यांमध्ये प्लॅस्टिक पिशव्या ,चॉकलेट ची वेष्टने डस्टबिनमध्ये न टाकता स्वतंत्रपणे जमा करण्याची सवय अंगी रुजली आहे. त्यांच्या मनामध्ये ही कृती रुजल्याने घरी देखील विद्यार्थी पालकांना सांगून स्वतंत्रपणे प्लास्टिक कचरा वेगळा करतात व इतरांना देखील करण्यास सांगतात.

## 13. समारोप-

विद्यार्थ्यांना प्लास्टिक कचरा व इलेक्ट्रॉनिक कचरा पर्यावरणाला घातक आहे याबाबत जागृती नव्हती. अशा वेळेस विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाबद्दल जिव्हाळा कसा निर्माण करावा या समस्येने मी अस्वस्थ होते .या नवोपक्रमाच्या कार्यवाहीनंतर माझी अस्वस्थता दूर झाली. माझ्या नवोपक्रमाच्या दरम्यान चांगले परिणाम दिसून आल्याने याबाबत मी समाधानी आहे.. विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक अशा चांगल्या सवयी लागल्या . त्यांच्या आचरणात व कृतीत बदल होऊन त्यांना निसर्गाबद्दल प्रेम निर्माण झाले. लहानपणापासूनच पर्यावरणाबद्दल प्रेम, जागृती निर्माण झाल्यामुळे भविष्यामध्ये नक्कीच पर्यावरणाच्या समस्या कमी होतील असा आशावाद वाटतो.

## 14. संदर्भसूची व परिशिष्टे-

1. उपक्रमशीलतेकडून कृतिसंशोधनाकडे सिद्धाराम माशाळे

2. पर्यावरण संरक्षण गतिविधि _एक परिचय

   लेखक श्रीहरी कृष्ण घळसासी

3 Eco mitram app

4. Poornam Ecovision संस्था

5. पर्यावरण दक्षता कृती मंच
6. Google / wikipedia
7. Scert website

उपक्रमात घेण्यात आलेल्या चाचणी लिंक-

https://forms.gle/XidyofyPJYpR4pBQ7

चाचणीत सहभागी विद्यार्थी यादी-

| अनु. | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|
| 1 | साहिल उमेश राठोड |
| 2 | कावेरी किशोर राठोड |
| 3 | शुभम कन्हैयालाल भारती |
| 4 | वैष्णवी सागर जाधव |
| 5 | विनायक महादेव निंबाळ |
| 6 | फरीहा राणी तसलीम अन्सारी |
| 7 | ज्योती गोपीनाथ राठोड |
| 8 | पूर्वी विजय भोंगाळे |
| 9 | श्रेयस नितीन जावीर |
| 10 | अनुराग शैलेंद्र गायकवाड |
| 11 | लीना युवराज गावित |
| 12 | आयेशा असलम पठाण |
| 13 | गुंजन योगेश सोनवणे |
| 14 | चेतन जगदीश प्रजापति |
| 15 | बाबू प्रकाश चव्हाण |
| 16 | क्षमस्वी मुरलीधर पावशे |
| 17 | दादासाहेब कळासे |
| 18 | भारती गजानन डिगोळे |
| 19 | साहिल विजय सोनावले |
| 20 | कृष्णा भारत चव्हाण |